नि.फौ.ख.क्रं.५/२०१८
शासन वि अनिल
नि.क्रं. ७२

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं. ६ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | बाजीराव तात्याबा आघाव |
| वय | : | ५६ वर्षे |
| व्यवसाय | : | नोकरी |
| राहणार | : | शिरुर–कासार,बीड. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही. एस. गव्हाळे यांचेमार्फत**

१. मी ऑगस्ट २०१७ साली पो.हेकॉ. म्हणून अंभोरा पोलिस स्टेशनला नेमणूकीस होतो. वरिष्ठांच्या आदेशाने गु.र.नं. २२३/२०१७ कलम ३२४, ३२३,५०४,५०६ भादवी प्रमाणे गुन्हाचा तपास माझेकडे आला. मला तपासाकामी प्रथम खबरी अहवाल, फिर्याद व इतर कागदपत्रे मिळाली. मी फिर्यादचे अवलोकन केले. त्यानंतर दोन पंचासमक्ष नि. ५१ प्रमाणे जप्ती व घटनास्थळ पंचनामा केला. पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. मुद्देमाल दगडी वरवंटा पाहिल्यास ओळखु शकतो. साक्षीदारास मुद्देमाल एम.ओ. १ दाखवला. सदर मुद्देमाल तोच असुन त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. सदर मुद्देमाल नि. २ प्रमाणे पावती करुन पोलीस स्टेशनला जमा केला व पावती दोषारोपपत्रात दाखल केली.

२. आरोपींना फौ.प्र.सं. ४१–अ व १७० प्रमाणे नोटीस दिली. साक्षीदारांचे तपास टिप्पन त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. आरोपींना अटक केली व इतर कार्यवाही केली. वैद्यकीय अधिकारी यांना प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र दिले. पत्र दाखवल्यास ओळखु शकतो. अभिलेखावरील दोन पत्र दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. दोन्ही पत्रास **अनुक्रमे नि. ७३ व ७४** देण्यात येते. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व दाखल केले. घटनास्थळाचे एम. ओ. २ ते ७ फोटो दोषारोपपत्रात दाखल केले. साक्षीदारास फोटो दाखवले. सदरचे फोटो तेच असल्याचे त्यांनी सांगितले. आरोपीचे विरुध्द सबळ पुरावे मिळून आलेने त्यांचे विरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस पाहिलेस ओळखू शकतो. **नि. ७१** वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र १ व २ यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफिचा अर्ज मंजुर.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. बी.व्ही. दाणी यांचे मार्फेत उलटतपास**

३. घटनेचा तपास माझ्याकडे दि. २२/०८/२०१७ रोजी आला. तपास येण्यापुर्वी घटना दोन दिवस अगोदर घडली. हे म्हणणे खरे आहे की, दोन उशिराने फिर्याद दिली आहे. उशिरा तक्रार दिलेबाबत तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने उशिरा तक्रार दिलेबाबत कारण फिर्यादमध्ये नमुद केले नाही. अंभोरा ते दादेगाव ७–८ कि.मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दादेगावला माझे येणे जाणे असते. फिर्यादीचा पती संतोष म्हस्के याच्यावर गुन्हे दाखल असलेबाबत माहिती नाही. अमान्य की, केवळ फिर्यादीच्या घरातील साक्षीदारांची तपासटिप्पन नोंदवले. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार क्र. १ ते ४ हे फिर्यादीच्या घरातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्या घराशेजारी इतर लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शेजारील लोकांचे जबाब नोंदवले नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीस पोलीसांनी नि. ६२ वरील कडा सरकारी दवाखान्याचे पत्र दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना आष्टी दवाखान्याचे पत्र दिले नाही. सुलेमान देवळा, कडा व धामणगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. फिर्यादी स्वतःहुन आष्टी दवाखान्यात आला. त्याला पत्र दिले नव्हते. अमान्य की, साक्षीदारांचे जबाब पोलीस स्टेशनला नोंदवले. अमान्य की, वैद्यकीय प्रमाणपत्र स्वतःहुन फिर्यादीने आणुन दिले. एम.ओ. २ ते ७ फोटो हे माझ्या मोबाईलने घेतले आहेत. त्याची मुळ प्रिंट माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, फोटोमध्ये तारीख व ठिकाण दिसुन येत नाही. अमान्य की, मुद्देमाल कोठेही उपलब्ध होतो. मुद्देमाल वरंवटा २–२.५ कि.ग्रा. वजनाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरंवटा फेकुन मारल्यास माणसाचा मृत्यु होऊ शकतो. अमान्य की, मुद्देमाल स्वतः उपलब्ध केला. पंचाची नावे सांगु शकतो. फिर्यादी व आरोपी यांचे ग्रामपंचायत निवडणुकीवरुन जुने वाद असलेबाबत माहिती नाही. अमान्य की, फिर्यादीचा पती सोबत चांगले संबंध असल्यामुळे खोटा तपास केला. अमान्य की, आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आला नाही. अमान्य की, खोटा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले. अमान्य की, सरतपासात मी खोटे सांगीतले आहे. अमान्य की, आरोपी विरुध्द मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दि. १५.०५.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.05.15 18:19:25 +0530

श्री.एम.आर.बडाख
३रे न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, आष्टी